सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/2331
दिनांक :- 26 AUG 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना-अनुदानित
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन.**

**संदर्भ:-** **१.** मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.८८ (१९३/२५)समन्वय दिनांक १८ ऑगस्ट २०२५.
२. मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक अमभा-२०२५/ प्र.क्र.१०२/भाषा-१ दिनांक १४/८/२०२५.

उपरोक्त संदर्भांकीत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक अमभा-२०२५/ प्र.क्र.१०२/भाषा-१ दिनांक १४/८/२०२५ व मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.८८ (१९३/२५) समन्वय दिनांक १८ ऑगस्ट २०२५ चे पत्र व सहपत्र सोबत जोडले असून कृपया त्याचे अवलोकन करावे व सदर पत्रात नमूद केलेल्या सूचनांनुसार आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

दिनांक ८ सप्टेम्बर २०२५ ते २२ सप्टेम्बर २०२५ या कालावधीत **"मराठी भाषा दूत"** ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, त्याकरीता **"अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा"** हा विषय देण्यात आला आहे. सदर ऑनलाईन स्पर्धेकरीता सहभाग नोंदविण्याचे आवाहन मराठी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे. त्यानुसार, सदर कार्यक्रमाची माहिती आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच whatsapp Group वर देण्यात यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
**अमरावती.**

**प्रत :** प्रोग्रामर, तं.शि.वि.का,अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

३५५

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांक:- संकीर्ण -२०२५/प्र.क्र. ८८ (१९३/२५) /समन्वय

दिनांक:- १८ ऑगस्ट, २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक, (ग्रंथालय), ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय- "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक अमभा-२०२५/ प्र.क्र. १०२/ भाषा-१, दिनांक १४/८/२०२५ चे पत्र व सहपत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. दिनांक ८ सप्टेंबर, २०२५ ते २२ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, त्याकरीता "अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा" हा विषय देण्यात आला आहे. सदर ऑनलाईन स्पर्धेकरीता सहभाग नोदविण्याचे आवाहन मराठी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे. त्यानुसार, सदर कार्यक्रमाची आपल्या विभागाच्या पोर्टल तसेच Whatsapp Group वर देण्याची विनंती सदरहू पत्रान्वये करण्यात आली आहे.

३. तरी, सोबतच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांनुसार आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

गौरी म्हस्के

(गौरी म्हस्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

का.१८

प्रत,

निवडनस्ती (समन्वय कक्ष).

"अभिजात मराठी - माझ्या अपेक्षा " या विषयावार वक्तृत्व स्पर्धा.

मराठी भाषा दूत वक्तृत्व स्पर्धा , महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित करण्यात आली आहे .

केंद्र शासनाच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ च्या अधिसूचनेन्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित करून दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस तर ३ ते ९ ऑक्टोबर हा सप्ताह अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताह मध्ये मराठी भाषा विभागातर्फे -मराठी भाषा दूत - ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा जगभरातील १८ ते २१ वयोगटातील मराठी बोलणाऱ्यांसाठी खुली असेल. "अभिजात मराठी- माझ्या अपेक्षा" या विषयावर जास्तीत जास्त तीन मिनिटांचा वेळ प्रत्येक स्पर्धकाला देण्यात येईल. स्पर्धेचे संयोजन ऑगस्ट मीडिया या संस्थेतर्फे केले जाईल. वक्तृत्व स्पर्धा दिनांक ८ सप्टेंबर २०२५ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. महाराष्ट्रातील वेगवेगळे महसूल विभाग तसेच बृहन्महाराष्ट्र मिळून प्रथम नोंदणी करणाऱ्या १००० स्पर्धकांना प्रवेश मिळेल.

स्पर्धकांनी विषयाचे आकलन करून तो विषय आपल्या पद्धतीने मांडणे अपेक्षित आहे. यामधून जास्तीत जास्त १०० उत्तम स्पर्धकांची निवड -मराठी भाषा दूत - म्हणून करण्यात येईल. तसेच, सर्व सहभागींना महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. गुगल फॉर्म पाठवण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ , रात्री १२ पर्यंत आहे.

या वयोगटातील जास्तीत जास्त युवकांनी या ऑनलाईन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन मराठी भाषाविभागातर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी https://forms.gle/NYvWxvYCSFXCjkzn9 या लिंक किंवा क्यू आर कोड वापरून ऑनलाईन नोंदणी करावी.

---